# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहीर निवेदन

### छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मार्फत प्रदान करण्यात येणारा 'छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार—२०१९' याकरिता व्यक्ती/संस्था/स्वयंसेवी संस्था यांच्याकडून शिफारशी मागविण्यात येत आहेत.

सदर पुरस्कारासाठी शैक्षणिक, कला, क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योग, राजनीती, रणनीती, अर्थनीती, मानवतावादी, जागतिक शांतता इ. क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर महनीय व अत्युच्च कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस, संस्थेस, कला, कृषी, पर्यावरण, साहित्य, समाजाला दिशा देणाऱ्या व्यक्ती, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महनीय व्यक्ती, राजनीतिज्ञ, माध्यमकर्मी इ.चे नामनिर्देशन करता येईल.

सदर पुरस्कार जात, धर्म, पंथ, वंश व लिंग यांचा विचार न करता प्रदान करण्यात येईल.

या पुरस्काराकरिता व्यक्ती/संस्था स्वतःचे नामनिर्देशन करू शकणार नाहीत.

सदर पुरस्काराचे स्वरूप रु. ५,००,०००/—, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे राहील.

या पुरस्काराकरिताच्या शिफारशी दि. २० जानेवारी, २०१९ पूर्वी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, (महाराष्ट्र) यांच्या नावे पाठविण्यात याव्यात.

प्रा. डॉ. विलास द.नांदवडेकर
कुलसचिव

कोल्हापूर.
दि. : 27 DEC 2018